महाराष्ट्रातील ऐतिहासिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील महत्वपूर्ण व्यक्तींच्या जीवनावर आधारीत मराठी चित्रपटांना सहाय्यक अनुदान देण्याबाबतच्या सुधारित नियम व अटींना मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक मचिअ-२००६/प्र.क्र.३०३/सां.का.३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ६ फेब्रुवारी, २००७

वाचा :- समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: मचिम १०९९/प्र.क्र.३०/सां.का.२, दिनांक २९ एप्रिल, १९९९.

**प्रस्तावना :-** महाराष्ट्रामध्ये अनेक मोठमोठे समाज सुधारक, ऐतिहासिक व्यक्ती, क्रांतीकारक होऊन गेले त्यांच्यामुळे महाराष्ट्राला महत्व प्राप्त झाले आहे. अशा व्यक्तींची ओळख, त्यांचे कर्तृत्व, त्यांची देशभक्ती, त्यांचे साहित्य तसेच कला व क्रीडा या क्षेत्रात त्यांनी केलेले कर्तृत्व यांची भावी पिढीला माहिती व्हावी व मराठी इतिहास साहित्यिक व सांस्कृतिक परंपरा जागृत राहावी त्याकरीता निर्माण करण्यात येणा-या चित्रपट निर्मिती खर्चाचा काही भाग अनुदान स्वरुपात देण्यात आल्यास मराठी चित्रपट निर्मितीस प्रोत्साहन मिळेल या उद्देशाने शासनाच्या दिनांक २९ एप्रिल, १९९९ च्या शासन निर्णयानुसार मराठी चित्रपटांना अनुदान मंजूर करण्यात येते.

**शासन निर्णय :-** महाराष्ट्रातील ऐतिहासिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील महत्वपूर्ण जेष्ठ व्यक्तिंच्या जीवनावर आधारित पुर्ण लांबीच्या मराठी चित्रपट निर्मितीस देण्यात येणा-या अनुदानाचा सुयोग्य वापर व्हावा या दृष्टीने अनुदान मंजुर करण्याच्या नियम व अटीमध्ये सुधारणा करण्याचीबाब शासनाच्या विचाराधीन होती. विचारांती या शासन निर्णयान्वये सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मधील सुधारित नियम व अटींना शासन मान्यता देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मीनाजोशी

( मीना जोशी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी विकास महामंडळ, गोरेगांव, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र ,१/२ ( लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई /नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सर्व कार्यासने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती सां.का.३

ROTA/H-1971 (4000-02-07)-1 (कृ.मा.प.)

(पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक मचिअ-२००६/प्र.क्र.३०३/सां.का.३, दिनांक :- ६ फेब्रुवारी, २००७ चे सहपत्र )

## परिशिष्ट " अ"

### महाराष्ट्रातील ऐतिहासिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील जेष्ठ व्यक्तिंच्या जीवनावर आधारीत पूर्ण लांबीच्या मराठी चित्रपट निर्मितीस सहाय्यक अनुदान.

**नियम व अटी :-**

१) ज्या ऐतिहासिक महत्वाच्या व्यक्तिवर चित्रपट निर्माण करावयाचा आहे अशा व्यक्तींची नावे शासन निश्चित करेल ही नावे निश्चित करण्याकरीता मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य ) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात यावी समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. मंत्री ( सांस्कृतिक कार्य ) | अध्यक्ष |
| २) | मा. राज्यमंत्री ( सांस्कृतिक कार्य ) | उपाध्यक्ष |
| ३) | सचिव ( सांस्कृतिक कार्य ) | सदस्य |
| ४) | संचालक, सांस्कृतिक कार्य | सदस्य सचिव |

या व्यतिरिक्त समितीमध्ये अध्यक्षांच्या मान्यतेने ऐतिहासिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील ३ मान्यवर व्यक्ती / तज्ञ यांना निमंत्रीत सदस्य म्हणून बोलविण्यात यावे.

२) उपरोक्त समितीने उपलब्ध आर्थिक तरतुदीनुसार कमाल रुपये ५० लक्ष या प्रमाणे आर्थिक वर्षात किती चित्रपटांना अनुदान द्यावयाचे आहे याची संख्या व नावे निश्चित करावीत. चित्रपटाची संख्या व नावे निश्चित झाल्यानंतर संचालक ( सांस्कृतिक कार्य ) यांनी याबाबतची माहिती वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन इच्छुक निर्मात्याकडून १ महिन्याच्या आत विहित नमुन्यात अर्ज मागवावेत.

३) दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीसाठी अनुदान देण्याच्या योजनेअंतर्गत दिनांक ११ ऑक्टोबर, २००५ च्या शासन निर्णयान्वये चित्रपट परिक्षण समिती गठीत करण्यात आली आहे.प्रस्तुत योजने अंतर्गत प्राप्त झालेले अर्ज संचालकांनी सदर परिक्षण समितीकडे छाननीसाठी पाठवावेत.
परिक्षण समितीने आवश्यक त्या कागदपत्रांच्या पूर्ततेची छाननी करुन तसेच चित्रपटाच्या स्क्रीप्ट व अन्य तांत्रिक बाबी विचारात घेऊन योग्य अशा निर्मात्याची शिफारस शासनास करावी. परिक्षण समितीच्या शिफारशी प्राप्त झाल्यावर शासनाच्या मान्यतेने अनुदान मंजुरी बाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

४) अनुदानाची रक्कम खालील प्रमाणे ३ हप्त्यात वितरीत करण्यात यावी.
अ) समितीच्या शिफारशी नुसार शासनाच्या मान्यतेने पहिला हप्ता २० % ( रुपये १० लक्ष जास्तीत जास्त ) सुरुवातीला देण्यात येईल.
ब) चित्रपटाचे प्रस्तावित लांबीच्या ५०% चित्रीकरण अंतिम स्वरुपात पूर्ण करुन प्रयोग शाळेचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर चित्रपटाचे परिक्षण समितीने परिक्षण करावे. समितीने शिफारस केल्यानंतर दुसऱ्या हप्त्याची रक्कम ५०% ( रुपये २५ लक्ष जास्तीत जास्त ) देण्यात यावी.

क) चित्रपटाचे पूर्ण चित्रीकरण झाल्यानंतर परिक्षण समितीच्या शिफारशी नंतर उर्वरित तिस-या हप्त्याची ३०% रक्कम ( रुपये १५ लक्ष जास्तीत जास्त ) देण्यात यावी.

५) अनुदानाच्या पहिल्या व तदूनंतरच्या हप्त्याची रक्कम विनियोजित केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाण पत्र प्राप्त झाल्यावर पुढील हप्त्याची रक्कम देण्यात येईल.

६) चित्रपट पूर्ण करण्याचा कालावधी जास्तीत जास्त दोन वर्षाचा असेल या मुदतीत निर्माता चित्रपट पूर्ण करु शकला नाही, तर अनुदानाची रक्कम प्रचलित असलेल्या दंडनीय व्याजदरासह शासनास परत करावी लागेल / शासन वसूल करेल. निर्मात्याने श्रेय नामावलीत हा चित्रपट महाराष्ट्र शासनाच्या अर्थ सहाय्यातून निर्माण करण्यात आला आहे याचा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक राहील.

७) तयार करण्यात आलेल्या चित्रपटाचे एक प्रिन्ट निर्मात्याने संचालक ( सांस्कृतिक कार्य ) यांच्याकडे विनामुल्य स्वरुपात देणे आवश्यक आहे.

८) सदर चित्रपट टीव्हीवर प्रसारीत करण्याचे अधिकार शासनाचे राहतील. अन्य अधिकार निर्मात्याचे राहतील.

९) चित्रपट सेन्सॉर संमत झाल्यानंतर सदर चित्रपट लोकांपर्यंत पोहचवण्याचे दृष्टीने निर्मात्याने एक वर्षाचे आत चित्रपट व्यावसायिक दृष्ट्या प्रदर्शित करणे बंधनकारक राहील. मात्र असे न केल्याचे आढळून आल्यास शासनाच्या अनुदानाची रक्कम दंडनीय व्याजासहीत चित्रपट निर्मात्याकडून वसुल करण्यात येईल. चित्रपटाचे सर्व हक्क शासन स्वतःकडे घेईल व चित्रपट लोकांपर्यंत पोहचण्याबाबतची कार्यवाही करेल. याबाबत चित्रपट निर्मात्याने शासनाबरोबर करारनामा करणे बंधनकारक असेल.

१०) निर्मात्याने चित्रीकरण केलेल्या भागाचे ( रिळाचे ) परिक्षण करण्याची व्यवस्था व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव यांनी करावी.

११) मंजूर रकमेचा विनियोग संबंधित चित्रपट निर्मात्याने पूर्णपणे चित्रपट निर्मितीसाठीच करावा. तसे न केल्याचे आढळून आल्यास दिलेली रक्कम शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या पध्दतीप्रमाणे आणि/ अथवा त्या निर्मात्याकडून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार वसूल केली जाईल. या संदर्भात निर्मात्याकडून बंधपत्राद्वारे सहमती पत्र स्टँप पेपर वर अर्थसहाय्य मंजूर करण्यापूर्वी घेण्यात यावे.

१२) इतर भाषेतील ( रिमेक ), संवादांतरीत ( डब ) किंवा सबटायटल केलेला चित्रपट या यांजनेतंर्गत अर्थसंकल्प सहाय्यासाठी पात्र समजला जाणार नाही.

१३) ही योजना लघुपटांसाठी अनुज्ञेय नाही.

H 1971-2a

-----------------------

सांस्कृतिक कार्य संचालनालय
महाराष्ट्र शासन
आवक क्रमांक ...
दिनांक ...
विभाग ...

महाराष्ट्रातील ऐतिहासिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील महत्वपूर्ण व्यक्तींच्या जीवनावर आधारित मराठी चित्रपटांना सहाय्यक अनुदान देण्यासाठी समिति गठीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः मचिअ-२००६/प्र.क्र.३०३ /सांका-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः २३ जुलै, २००७

वाचा:- १.पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शा.नि.क्र.मचिअ-२००६/प्र.क्र.३०३/ सां.का.३ दिनांक ६ फेब्रुवारी, २००७

**शासन निर्णयः-** महाराष्ट्रातील ऐतिहासिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील महत्वपूर्ण व्यक्तींच्या जीवनावर आधारित मराठी चित्रपटांना सहाय्यक अनुदान देण्याबाबतच्या सुधारीत नियम व अटींना दिनांक ६ फेब्रुवारी, २००७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. शासन निर्णयानुसार ज्या ऐतिहासिक महत्वाच्या व्यक्तीवर चित्रपट निर्माण करावयाचा आहे अशा व्यक्तींची नावे निश्चित करण्यासाठी वरील दि.६/२/२००७ च्या आदेशाच्य परिशिष्ट "अ" मधील अट क्र.१ नुसार शासन स्तरावर मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

| | |
|---|---|
| मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) | अध्यक्ष |
| मा. राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) | उपाध्यक्ष |
| सचिव (सांस्कृतिक कार्य) | सदस्य |
| अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ | अशासकीय सदस्य |
| अध्यक्ष, मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ | अशासकीय सदस्य |
| अध्यक्ष, रंगभूमि प्रयोग परिनिरिक्षण मंडळ | अशासकीय सदस्य |
| संचालक (सांस्कृतिक कार्य) | सदस्य सचिव |

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

मीना जोशी

( मीना जोशी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहाय्यक
मा.राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहाय्यक
मा.सचिव, सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहाय्यक
संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
अध्यक्ष, साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई
अध्यक्ष, विश्वकोष मंडळ, मुंबई
अध्यक्ष रंगभूमि परिनिरीक्षण मंडळ, मुंबई
निवड नस्ती सां.का.